ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi / Hindi | January - March - 2019

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | तुझे आहे तुजपाशी : एक नाट्यावलोकन<br>**प्रा. नीरज बोरसे** | १-३ |
| २ | पु. ल. देशपांडे यांचे व्यक्तिचित्रणात्मक लेखन<br>**दत्तात्रय त्रिंबक भानुसे** | ४-७ |
| ३ | प्रातिनिधिक स्वरूपाचे नमुने : 'व्यक्ती आणि वल्ली'<br>**डॉ. युवराज धबडगे** | ८-१० |
| ४ | पु. ल. देशपांडे यांच्या विनोदी लेखणाची चिकित्सा<br>**डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील** | ११-१३ |
| ५ | पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यातील विनोद : विशेष संदर्भ असा मी आसामी<br>**प्रा. डॉ. मारोती गायकवाड** | १४-१९ |
| ६ | अर्थभिन्नत्वातून पुलचे विनोद<br>**डॉ. विठ्ठल जंबाले** | २०-२३ |
| ७ | भाई व्यक्ती की वल्ली : माध्यमांतर समीक्षा<br>**प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे** | २४-२८ |
| ८ | पु. ल. च्या साहित्यातील वाङ्मयीन मूल्यात्मकता<br>**डॉ. कैलास इंगळे** | २९-३३ |
| ९ | पु. ल. देशपांडे: व्यक्ती आणि वाड्मय<br>**प्रा. संदीप परदेशी**<br>**डॉ. गणेश मोहिते** | ३४-३७ |
| १० | पु. ल. देशपांडे यांचे प्रवासवर्ण लेखन<br>**प्रा. डॉ. शिल्पा म्हात्रे - काकडे** | ३८-४१ |
| ११ | पु. ल. देशपांडे यांचे कथालेखन<br>**सहा. प्रा. रा. ज. चाटे** | ४२-४४ |
| १२ | पु. ल. देशपांडे यांचे साहित्य व कलाक्षेत्रातील योगदान<br>**डॉ. राखी सिद्राम सलगर** | ४५-४७ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १०. पु. ल. देशपांडे यांचे प्रवासवर्ण लेखन

**प्रा. डॉ. शिल्पा म्हात्रे – काकडे**
संत भगवानबाबा महाविद्यालय, सिंदरखेडराजा, जि. बुलढाणा.

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व म्हणजे पु.ल. देश्पांडे, पु.ल. बहुरुपी होते. लेखक, नाटककार, अभिनेता, कथा व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक अशा अनेक भूमिका त्यांनी वठवल्या, त्यांची किर्ती लेखक म्हणून असली तरी त्यांची गती सर्व क्षेत्रात सारखीच होती.

मुंबईत जन्मलेले पु.ल. देशपांडे पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात आणि सांगलीच्या विलिंग्टन महाविद्यालयात शिकले. चाळीसव्या दशकात साहित्य क्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी त्यांनी महाविद्यालयात शिक्षक या नात्यानेही काही काळ काम केले. त्यांचे आकाशवाणी, दुरदर्शन, नाट्य व चित्रपट क्षेत्रातील योगदान लक्षणीय आहे. ते उत्तम संवादिनी वादक होते. तसेच त्यांनी काही चित्रपटांचे संगीत दिग्दर्शनही केले. दुरदर्शनच्या पहिल्या पहिल्या प्रसारणासाठी पंडित नेहरुंनी दूरदर्शनसाठी मुलाखात घेणारे पु.लं. हे भारतीय दूरदर्शनचे पहिले मुलाखतकार होते.

पु.लं.नी जवळपास चाळीस वेगवेगळी पुस्तके लिहिली. बटाटयाची चाळ, असा मी असा मी, व्यक्ती आणि वल्ली या पुस्तकांच्या तर वीसहून अधिक आवृत्त्या खपल्या. मराठी वाङ्मयाचा (गाळीवा) इतिहास, खोगीर भरती, पुरचुंडी, नस्ती उठाठेव, गोळाबेरीज, हसवणूक ही त्यांची इतर विनोदी पुस्तकेही गाजली. त्यांच्या आवृत्यांचेही विक्रम झाले.

'गुळाचा गणपती' या सबकुछ पु.ल. म्हणून गाजलेल्या चित्रपटात व त्यांच्या आताच्या 'भाई' चित्रपटावरुन त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जवळ जवळ सर्वच पैलूंचे दर्शन होते. पु.लं.नी मराठी माणसाला काय दिले ? तर त्याच्या रोजच्या जगण्यातील गंमतीदार निरीक्षणे नेमकेपणाने पकडून त्याला हसायला शिकवले. साहित्य, नाट्य, संगीत, चित्रपट या विविध क्षेत्रात पु.ल.वावरले व या विविध क्षेत्रातील त्यांना अनुभवावयास आलेली विसंगती त्यांनी विनोदाव्दारे त्यांच्या साहित्यातून प्रकट केली आहे. विनोदाला कलेच्या क्षेत्रात मोठी परिणामकारकता त्यांनी दिली. त्यांची निरीक्षणशक्ती अफाट होती, हे त्यांनी लिहिलेल्या प्रवास वर्णनावरुन कळेलच. त्यांनी अमेरिका, युरोप, आशियातील अनेक देश पाहिले.

त्यात त्यांना प्रवासात आलेले अनुभव त्यांनी अतिशय गमतीदार पध्दतीने लिहिले आहेत. पूर्वरंग, अपूर्वाई जावे त्यांच्या देशा, वंगचित्रे आदि प्रवास वर्णन आहेत.

**(१) पूर्वरंग**

पूर्वरंग हे पु.ल.देशपांडे यांनी लिहिलेले मराठी भाषेतील प्रवास वर्णनात्मक पुस्तक आहे. पु.ल.देशपांडे यांनी केलेल्या आग्नेय आशिया व पूर्व आशियातील देशांतील भ्रमंतीवर हे प्रवास वर्णन लिहिले आहे. इ.स.१९६२ सालच्या जानेवारी ते मे महिन्यांदरम्यान हा प्रवास पु.ल.देशपांडे व त्यांच्या पत्नी सुनिता देशपांडे यांनी केला. आग्नेय आशियातील सिंगापुरापासून

प्रवासाची सुरुवात होऊन पूर्व आशियातील जपानभेटीने त्यांची सांगता होते. या प्रवासात सिंगापूर व जपान व्यतिरिक्त त्यांनी मलेशिया (तत्कालीन मलाय्या), थायलंड, इंडोनेशियातील जावा व बाली बेटे, पूर्व आशियातील हाँगकाँग या ठिकाणास भेट दिली. तसेच जहाज प्रवासाचा पहिला थांबा असलेल्या श्रीलंकेतील कोलंबो शहरातल्या भटकंतीचे वर्णन या पुस्तकात अंतर्भूत आहे.

या चार महिन्यांतील प्रवासात भेट दिलेल्या विविध देशांतील अनुभव, तिथे भेटलेले लोक, स्थानिक भाषा, तिथले सांस्कृतिक वातावरण, कलाप्रकार, खाद्यसंस्कृती अशांसारख्या अनेक गोष्टी पुस्तकात मांडल्या आहेत.

**वंग चित्रे**

१९७० मध्ये सुप्रसिध्द मराठी साहित्यिक पु.ल.देशपांडे 'बंगाली' शिकण्यासाठी शांतिनिकेतनमध्ये आपल्या पत्नीसह काही दिवस जाऊन राहिले होते. तेथे त्यांनी बंगाली भाषा शिकण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांतील आनंद, तसेच बंगालमधील तत्कालीन सामाजिक परिस्थिती, शांतिनिकेतनचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतरची सदर संस्थेची परिस्थिती व तेथील लोकांची मनःस्थिती, या बंगालच्या यात्रेत भेटलेली लक्षात राहण्यासारखी माणसे यांचे वर्णन पु.लं. नी 'वंगचित्रे' या पुस्तकात केले आहे. छोटया छोटया वाटणा-या मात्र मानवी जीवनावर दूरगामी परिणाम करणा-या गोष्टींवर या पुस्तकामध्ये सुंदर मार्गदर्शन मिळते. उदा. मुलांना त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडू द्यावे हा विषय किंवा मुलांचा मोठे होताना विकास कसा होतो इ. विषय त्यांनी 'वंगचित्रे' रेखाटले आहेत.

**जावे त्यांच्या देशा**

'जावे त्यांच्या देशा' हे पु.ल.देशपांडे यांनी लिहिलेले मराठी भाषेतील प्रवास वर्णनात्मक पुस्तक आहे. इटली, न्यूयॉर्क, अमेरिका, सान्फ्रान्सिस्को, हंगेरी पु.ल. ने प्रवास केला. तेथील सौंदर्य, सांस्कृतिक वातावरण, सामाजिक तिथल्या कला, खाद्य संस्कृती यांचे वर्णन त्यांनी केले. पुस्तकाच्या सुरुवातीलाच ते म्हणतात, ''माझ्या पायावर चक्र आहे की नाही ते मला ठाऊक नाही. पण मला येणारे प्रवासाचे योग पाहिल्यावर एखाद्या ज्योतिष्याला पाय दाखवावेसे वाटायला लागले आहे. एक गोष्ट मात्र खरी. मी मायदेशात तसा बैठा माणूस आहे. परदेशात मात्र खूप हिंडतो. अधाश्यासारखा पाहतो आणि ऐकतो नव्हे, पाहण्यासाठी हिंडतो. कुठे काय ऐकण्यासारखे आहे ते शोधत जातो आणि जे काही ऐकले - पाहिले ते सांगायची मला ओढ लागते आणि त्यातूनच माझे हे लिहिणे घडते. ही फिरत्याची खोड आहे. सुटेल तेव्हा सुटेल ! त्यातून माझे हे सांगणे ऐकणारेही भेटत आहे, आहेत हे माझे भाग्य !

ना वंशाचे, ना भाषेचे, ना धर्माचे, ना राष्ट्राचे असे कितीतरी लोक हया प्रवासात यथा काष्ठंच काष्ठंच म्हणतात तसे भेटतात. ख-याची दारे मोकळी करतात. कोण कुठला जर्मन आबिल, कुठली स्कॉटिश ब्रॉमलेबाइई, हंगेरीतला गेझा काका, पोन्नानेनी, डॉ.बेंके योशेफ आणि त्याची भेट .......... राज्यातून उतरलेली छोटी एस्थेर...... पुन्हा दिसणार देखील नाहीत.... मनःपटलावर कायमची चित्रित झालेली पॅरिसमधल्या सीनच्या तीरावरची संध्याकाळ, कोण्या जपानी गेशाचा कानात वर्षानुवर्षे

रेंगाळणारा तो 'सायोनाऽऽरा' ! अनपेक्षितपणाने दिसलेला तो शेर्दाचा 'थिंकर' ... बर्लिनच्या ऑपेरा हाऊसमध्ये 'बार्बर ऑफ सेव्हिली' च्या नांदीचे अप्रतिम वाद्यसंगीत ऐकताना अर्जेन्टिनातल्या मारियाचे डबडबलेले निळे निळे डोळे...... प्रतिभेचे थोर देणे लाभलेल्या एखाद्या साहित्यकाराने हयातून शब्दांची कितीतरी मोठी शिल्पे उभी केली असती.....''

यातून पु.ल.देशपांडे किती कलासक्त आहेत ते म्हणतात, मी अधाशासारखा पाहतो आणि पाहण्यासाठी हिंडतो. प्रवासात भेटणा-या व्यक्तीविषयी ते कुठल्याही देशाचे, भाषेचे, वंशाचे, राष्ट्राचे असले तरी त्यांच्या विषयी वाटणारा, आपलेपणा, आदरभाव, स्नेह, आपुलकी, जिव्हाळा ते त्यांच्या प्रवास वर्णनात रेखाटतांना दिसतात. व्यासंग अभ्यास, अवलोकन आणि विविध क्षेत्रातील संपन्न अनुभव यामुळे पु.ल. नां विलक्षण लोकप्रियता लाभली.

**अपूर्वाई**

'अपूर्वाई' या प्रवास वर्णनात त्यांच्या लंडनच्या प्रवासाची हकिकत आहे. प्रत्येकाला आयुष्यात प्रवास कधी ना कधी करावाच लागतो. विशेषतः हा प्रवास परदेशचा असला तर सामान्य माणूस भांबावून जातो. पासपोर्ट, व्हिसा ही प्रकरणे व पाश्चात्यांचे रीतीरिवाज या विषयीचे दडपण उगीचच वाटू लागते. याचे विनोदी पध्दतीचे वास्तव वर्णन त्यांनी 'अपूर्वाई' मध्ये केले. पु.लं. चा विनोद अभिरुची संपन्न व शब्दांतील सूक्ष्म, तरल छटांचे दर्शन घडविणारा आहे. परंतू त्यांच्या विनोदात कुठेही क्लिष्टता किंवा दुर्बोधता आलेली नाही. पु.ल. जीवनाचे व लोकव्यवहाराचे मार्मिक निरीक्षण करतात व त्यावर मिष्कील भाष्य करतात.

(१) अपूर्वाई मध्ये लेखक लिहितात, ''विमानात पाऊल ठेवण्यापूर्वी सुमारे पाससहा तास मला टाय बांधता येत नाही हे कुटूंबातल्या प्रत्येकाने पटवून दिले.''

(२) ''पाश्चात्य रितीरिवाजांबद्दल परदेशी गेलेल्या व ब-याचशा न गेलेल्या लोकांनी माझी बौध्दिक घ्यायला सुरुवात केली.''

(३) तत्पूर्वी उभा पंधरवडा 'परदेशी कसे वागावे' हे निमूटपणे ऐकण्यात गेला होता. या उल्लेखांवरुन लेखकाने याविषयी घाबरलेल्या, परदेशप्रवास व पाश्चात्य रितीरिवाज याविषयी कसलेही ज्ञान नसलेल्या साध्याभोळया मध्यमवर्गीय गृहस्थाची भूमिका धारण केली आहे असे लक्षात येईल. या भूमिकेतूनच तो अनुभव घेत आहे. मराठी मध्यमवर्गीय संस्कृती त्यांच्या 'अंग' वळणी पडली आहे, कोल्हापूरी पायताण अगर तत्सम चपलेला सोकावलेला माझा पाय बुटात बसायला तयार होईना, कपडे बिघडतात म्हणजे नवकी काय होते हे मला कपडे घालायला लागण्याला इतकी वर्षे लोटून देखील अजूनही उमगले नाही हे देखील या भूमिकेचे समर्थन करण्यासाठीच लेखकाने लिहिले आहे.

प्रवासाच्या पूर्वतयारीचा अनुभव प्रतिपादन करताना वाचिक विनोदाचा उपयोग पु.ल. देशपांडे यांनी केला आहे.अने श्लेषार्थ त्यांना सहजगत्या सुचतात. शब्दातील सूक्ष्म छटांचे मार्मिक दर्शन ते घडवितात. 'माझा चालू बूट निकामी ठरवून इंग्रजी

हवेला टिकेल असाच बुट मी करवून घेतला पाहिजे, असा बूट निघाला. येथे 'बूट निघणे' या वाक्प्रचाराचा पायात घालण्याच्या बुटाशी संबंध जोडून सूक्ष्म कोटिक्रम लेखकाने साधला आहे.

'पायाभरणी केल्यासारखे लंबचौडे पाय,' धुलाईत धुव्वा उडतो, अशा शब्दयोजनेतही पु.ल. ने कल्पना चातुर्य निदर्शनास येते.

'तो कापड फाडल्यासारखे इंग्रजी फाडत होता. माझे हिंदी त्याच्या इंग्रजीइतकेच बिनअस्तराचे होते हा भाग निराळा ! या ठिकाणी इंग्रजी फाडणे, बिनअस्तराचे हिंदी या वाक्प्रचारात शिंप्याच्या व्यवसायाशी संबंधित असा अर्थ लेखकाने मोठ्या खुबीदारपणे सूचित केला आहे.

शिक्षणक्षेत्र, आकाशवाणी, दूरदर्शन, नाट्य, संगीत, साहित्य, चित्रपट या सर्व क्षेत्रांत ते वावरले. या विविध क्षेत्रांत ज्या अनिष्ट प्रवृत्ती त्यांना आढळल्या त्याचे दोषदिग्दर्शक त्यांनी विनोदाच्या माध्यमाव्दार केले. त्यांनी कधी व्यक्तीवर हल्ला करीत नाहीत तर त्यांचा हल्ला हा प्रवृत्तींवर असतो. विनोद ही केवळ शैली नाही ती जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आहे, तो 'स्व' भाव आहे, असे त्यांचे मत आहे, त्यामुळे त्यांची प्रवास वर्णन या वाड्.मय प्रकारास विनोदाचे अधिष्ठान लाभले आहे. सूक्ष्म निरीक्षणशक्ती व अनुभवसंपन्नता यामुळे त्यांच्या विनोदात विविधता आली आहे. अत्यंत अभिरुची विनोदी लेखन करणारे साहित्यिक म्हणून पु.ल.देशपांडे ओळखले जातात.

अनेकांगी रसिकता हे पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्वाचे एक विलोभनीय अंग आहे. हे त्यांचे प्रवासवर्णने वाचतांना जाणवते.

डॉ.स.ग. मालशे म्हणतात, ''पू.ल.देशपांडे यांचे कुठलेही प्रवासवर्णन वाचताना विनोदी लेखक म्हणून त्यांची जी वैशिष्टये आहेत ती सारी तिथे आविष्कृत झालेली आहेत. हे लक्षात येते. जीवनातील संगतीविसंगतीचा शोध घेत अत्युक्तीच्या साहाय्याने खेळकरपणाने ते आपल्या व्यक्तिमत्वाचे रंग मिसळून त्याची खुलावर करतात.''

खरोखरच त्यांची प्रवास वर्णने वाचतांना त्यांचे रसिकता, कलासक्त, विनोदी, खेळकर, खवैय्ये म्हणून व्यक्तिमत्व आपल्या डोळयापुढे उभे राहते.